


# । टायगर सायक्लो वॉक ।

एक काळ होता जेव्हा म्हंटले जाई की 'सह्याद्रीत फक्त तीन गोष्टी हिंडू शकतात'; ते म्हणजे 'वारा, वाघ आणि मावळे'. मात्र आज तो काळ फक्त आठवणींत राहिला आहे. कारण आज सह्याद्रीत फक्त वारा हिंडताना आढळतो. कारण मावळे (कृतीने) केव्हाच नाहीसे झाले तर वाघ उरले केवळ अभयारण्यांत. आपल्या अन्नसाखळीमध्ये वाघाचे महत्व अनन्य साधारण आहे हे आपण शाळेत शिकलोच आहोत. परंतु तरीही काही अशिक्षित (किंवा अतिशिक्षित) लोक शुल्लक अर्थप्राप्ती वाघाची शिकार करत आहेत. त्यामुळे 'वाघ बचाव मोहिम' आज एक गरज बनली आहे.


श्री. सुनिल जोशी

ही गरज ओळखून ठाण्याचे प्रसिद्ध गिर्यारोहक आणि उद्योगपती श्री. सुनिल जोशी यांच्या नेतृत्वाने 'टायगर सायक्लो वॉक – हायलँड्स टू ओशन'' ही आगळी वेगळी 'व्याघ्र बचाव मोहिम' सुरू करण्यात आली आहे. ह्या मोहिमेची माहिती आपण आज पाहूया.

<u>उद्देश</u>: 'वाघांचं संरक्षण केलं, तर आपोआप वनांचं आणि पर्यावरणाचं संरक्षण होईल' हा संदेश जनमानसांमध्ये पसरवणं हे या मोहिमेचं मुख्य उद्दिष्टय आहे.

<u>ध्येय</u>: बंगाल वाघांना संरक्षित प्रजाती घोषित केल्याने अभयारण्यांत वन्यजीवन सुधारण्यास आणि विकसित करण्यास वाव मिळाला आहे. वन्य निसर्ग आणि मानवी जीवन यांमध्ये एक आदरयुक्त संबंध तयार केला जाऊ शकतो. अभयारण्यांच्या आसपास राहणाऱ्या लोकांमध्ये अभिरूची निर्माण करून त्यांनाच अभयारण्य संरक्षित करण्यास प्रोत्साहन देता येईल. मूळ भारतीय उगम असणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण करून निसर्गाचा समतोल राखता येईल.

<u>उपक्रम</u>: मोहिमेअंतर्गत जनजागृतीसाठी अंदाजे १२०० किलोमीटर्स अंतर सायकलीने आणि/किंवा पायी पार करणे.

## मोहिमेचा कालावधी: १४ डिसेंबर २०१३ ते १० फेब्रुवारी २०१४ (एकूण ६० दिवस)

कार्यक्रम: मोहिमेदरम्यान 'टायगर सायक्लो वॉक टीमद्वारे पुढील उपक्रम राबविले जाणार आहेत.

१. सायक्लो वॉकदरम्यान प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी वाघ आणि निसर्ग संरक्षण आणि संवर्धनाशी निगडीत स्लाईड–शो, व्याख्याने आणि फिल्म–शो आयोजित करण्यात येतील. हा उपक्रम प्रामुख्याने शिक्षण संस्था आणि सामाजिक संघटनांसाठी असेल, ज्याचा लाभ इतरही उत्सुक घेऊ शकतील.

२. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी असलेल्या लोकांना सायक्लो वॉकमध्ये (ठराविक अंतरासाठी) भाग घेण्यास प्रवृत्त करून मोहिमेस बळकटी आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

३. संपूर्ण मोहिमेदरम्यान ठिकठिकाणी वृक्षारोपण उपक्रम राबवून सामजिक वनीकरणाचा संदेश देण्यात येईल आणि त्याद्वारे उद्‌देश साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.



४. बॅनर, होर्डिंग, पोस्टर, लिफलेट्स इत्यादी प्रसिद्धी माध्यमांद्वारे व्याघ्र बचाव मोहिमेचा संदेश प्रसारित करण्यात येईल.

५. मोहिमेशी निगडीत विविध लेख आणि फोटो, विविध वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांद्वारे प्रसिद्ध करून मोहिमेचा 'निसर्ग वाचवा, वाघ वाचवा' हा संदेश आणि उद्देश जास्तित जास्त जनसमुदायापर्यंत पोहोचवला जाईल. त्याचप्रमाणे इंटरनेट सारख्या माध्यम्यातून अशी प्रसिद्धी करून मोहिमेचा प्रसार आणि प्रचार जगभर करण्यात येईल. टि.व्ही. माध्यम्याद्वारे गाव, राज्य, राष्ट्र आणि जागतिक पातळीवर मोहिमेविषयी जनजागृती करण्यात येईल.

स्थानिक आणि जगभरातील, शाळा, कॉलेजेस, निसर्गमित्र संस्था, वन्यजीव संवर्धन संघटना, पक्षीमित्र, सामाजिक संघटना, पर्यावरणमित्र, साहसी संस्था, फोटोग्राफी क्लब आणि इतर उत्सुक जनसमुदायातून स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांना मोहिमेत (पुढील पदांसाठी) सहभाग घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

**पी.आर. (जनसंपर्क) टिम:** दोन जागा – निधी उभारणे आणि जनसंपर्क प्रस्थापित करणे.

**वॉकींग (पदयात्री) टिम:** दोन जागा – संपूर्ण मोहिमेदरम्यान किंवा ठराविक टप्प्याकरिता, ठराविक काळ चालणारे समर्पित पदयात्री.

**सायक्लींग टिम:** दोन जागा – संपूर्ण मोहिमेदरम्यान किंवा ठराविक टप्प्याकरिता, ठराविक काळ सायकल चालवणारे समर्पित सायकलस्वार.

**एज्युकेशनल (शैक्षणिक) टिम:** दोन जागा – संपूर्ण मोहिमेदरम्यान किंवा ठराविक टप्प्याकरिता, वन्यजीवन, वाघ व व्याघ्रसंवर्धन आणि निगडीत विषयांवर व्याख्याने, स्लाईड–शो, फिल्म–शो आयोजित करणारे समर्पित सहयात्री.

**सपोर्ट (सहकारी) टिम:** दोन जागा – संपूर्ण मोहिमेदरम्यान, अचाट कामे (ड्रायव्हिंग, कुकींग, कॅम्प सेटअप इ.) करणारे समर्पित सहयात्री.

संपूर्ण मोहिमेदरम्यान, उपरोक्त ११ जणांची टिम कायम राहिल. यामधील सहभागी ठराविक टप्प्याकरितादेखिल सहभाग घेऊ शकतील. टप्प्याचा कालावधी, पी.आर. टीम आणि सपोर्ट टीममधील कार्यकर्त्यांसाठी किमान १० दिवस तर इतर टीमसाठी किमान ७ दिवस आहे.

मोहिमेचे वेळापत्रक पाहण्यासाठी कृपया पुढिल लिंकवर क्लिक करावे अथवा लिंक कॉपी करून ब्राउजरमध्ये पेस्ट करून एन्टर करावे.

http://tigercyclowalk.weebly.com/schedule--route-map.html

धडाडीच्या आणि समर्पित कार्यकर्त्यांनी सहभाग घेण्यासाठी कृपया पुढिल लिंकवर क्लिक करावे अथवा लिंक कॉपी करून ब्राउजरमध्ये पेस्ट करून एन्टर करावे.

http://tigercyclowalk.weebly.com/appeal.html

## संपर्क क्रमांक:

श्री. सुनिल जोशी – ९२२३३१९२१६ / ९८६९७२४९२९
ई–मेल: tiger.cyclowalk@gmail.com
वेबसाईट: http://tigercyclowalk.weebly.com
फेसबुक: https://www.facebook.com/tigercyclowalk

